| जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेबसाईटः- www.nanded.gov.in | ई- मेलः- laoconanded@gmail.com |
| दुरध्वनी क्रमांकः-02462-235077/244651 | फॅक्स क्रमांकः- 02462- 238500 |
| शाखा:- भूसंपादन समन्वय | क्रमांक 2017/आरबी/डेस्क-3/भूसं/सिआर- 63 |

दिनांक 10.8.17

5116/
11.8.17

प्रति,
उपविभागीय अधिकारी, तथा
भूसंपादन अधिकारी, कंधार

विषय - भूसंपादन प्रस्ताव - येलदरीतांडा साठवण तलावासाठी मौ. येलदरीतांडा ता. लोहा जि. नांदेड (कलम 11(1) च्या अधिसूचनेस मुदतवाढ मिळणे बाबत.)

संदर्भ - आपले कार्यालयीन पत्र क्र.2017/उविअ/भुसं//सिआर दिनांक 11.07.2017

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये भूसंपादन कायदा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार भूसंपादन प्रकरणात कलम 11(1) ची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासुन बारा महिन्याच्या आत कलम 19(1) ची अधिसूचना प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. परंतु उक्त प्रकरणात संयुक्त मोजणीसाठी विलंब झाल्यामुळे एक वर्षाच्या आत कलम 19(1) ची अधिसूचना प्रसिद्ध करता आलेली नाही. करिता प्रकरणात समुचित शासनाला बारा महिन्याचा कालावधी वाढवुन देण्याची आपण विनंती केलेली आहे.

संचिकेची तपासणी केली असता कलम 11(1) ची अंतीम प्रसिद्धी दिनांक 05.08.2016 रोजी झाली आहे. तसेच 05.10.2015 रोजी संपादक संघाकडून रु. 25,00,000/- प्राप्त झालेले दिसून येते. प्रकरणात उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कंधार अथवा संपादक संघ यांनी मोजणी फिस न भरल्यामुळे संयुक्त मोजणी झालेली नाही असे दिसते. मोजणी झालेली नसल्यामुळे स्थळ पाहणीची कार्यवाही प्रलंबित आहे व त्यामुळे भूसंपादनाची पुढील प्रक्रिया रखडलेली आहे

करिता प्रकणात 12 महिण्याची मुदतवाढ देण्यात येत असून कळविण्यात येते की, तात्काळ मोजणी फिस भरुन मोजणी अहवाल प्राप्त करुन घ्यावा व प्रकरण व्यपगत होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. देण्यात आलेली मुदतवाढ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. प्रकरणात विलंबास जबाबदार असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत - मूळ संचिका.

जिल्हाधिकारी नांदेड

प्रतिलिपी:
उप अधिक्षक भूमि अभिलेख, लोहा यांना देवुन कळविण्यात येते की, सदरील प्रकरणात तात्काळ मोजणी करुन अहवाल उपविभागीय अधिकारी कंधार यांच्या कार्यालयास सादर करावा.

जिल्हाधिकारी नांदेड

28/8/2017
T0 13/4479